**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२६/२०१८**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.१**
**नि.क्र.५९ लगत**

**वादीतर्फे सा.क्र.१ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.बी.विधाते यांचेमार्फत सुरु–**

आता मला नि.क्र.३६ सोबत अ.क्र.१ ला असलेला कागद दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्वे नं.११२/अ च्या पोट हिश्श्यासंदर्भात दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे विधीज्ञांनी नमुद केले की, त्यांना नि.क्र.३६ सोबतचा अ.क्र. १ चा कागद पुराव्याच्याकामी मान्य केल्याने त्यास **नि.क्र. ८४** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आता मला नि.क्र. ३६/२ वरील कागद दाखवण्यात आला. तो कागद हा सर्वे नं.११२/अ चा गट नंबर झाल्याबाबतचा आहे. सदर कागदास **नि.क्र. ८५** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला नि.क्र. ३६/३ सोबत असलेली झेरॉक्स प्रत दाखवण्यात आली. तो बामणोली गावचा नकाशा आहे. सदर नकाशा हा झेरॉक्स प्रतीत असून तो प्रतिवादीचे विधीज्ञ यांना मान्य असल्याने त्यास **नि.क्र. ८६** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.४० चा गट नं.१०५२ असा झाला. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.३७ चा गट नं.१०५३ असा झाला. हे म्हणणे खरे आहे की, गट योजना १९८३ साली आमच्या गावाला झाली. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.३५ व ३९ चा गट नं.१०५५ असा झाला. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी गट योजना झाली त्यावेळी सर्व लोकांचे जबाब झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नं.११२ मधील सर्व लोकांचे जबाब हे एकत्रीकरणावेळी झाले. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.१०५५ मध्ये प्रतिवादी क्र.१ ने सध्या घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूला घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही दावा दाखल करेपर्यंत मोकळी जागा होती. गट नं.१०५५ हे दावा मिळकत आहे किंवा नाही याबाबत मी काही सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत १०५५ आहे किंवा नाही हे मी खात्रीशीर सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१०५४, १०५५ व १०५८ या मालकांना गट नं.१०५५ च्या पश्चिम बाजूने जाणेयेणेसाठी ३ फुटाचे बोळ आहे.

प्रश्न– ते ३ फुटाचे बोळ गट नं.१०५४ पासून १०५८ मध्ये येण्यासाठी आडवे आहे /

उत्तर– ते पूर्व पश्चिम आडवे होते.

हे म्हणणे खरे आहे की, पश्चिमेकडील बोळाने आत येताना प्रतिवादी यांचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांच्या घराच्या दक्षिणेकडील बाजूने दक्षिणेकडील रस्त्यापर्यंत मोकळी जागा होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांच्या घराच्या दक्षिणेकडील बाजूने दक्षिणेकडील रस्त्यापर्यंत मोकळी जागा होती त्यामध्ये आता नि.क्र.५ मंजूर झाल्यानंतर रस्त्याच्या बाजूने शेड मारलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५ मंजूर झाल्यानंतर जे शेड बांधले आहे त्याच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही काम मी अदयाप केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे घर व सध्या मारलेले शेड याच्यामध्ये मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, १९६५–६६ साली प्रतिवादीचे घर व रस्त्यापर्यंतची जागा याचे ४ उतारे निघत होते. मी आण्णा सखाराम तरडे यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, १९६५–६६ साली आण्णा सखाराम तरडे यांच्या नावाचा २६२ चा उतारा निघत होता. हे म्हणणे खरे नाही की, २६२ सर्वे नंबरची जागा ही आप्पा सखाराम तरडे यांची निघत होती. हे म्हणणे खरे नाही की, आण्णा परबती तरडे यांची २६१ मध्ये जागा निघत होती. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मोकळया जागेमध्ये धोंडी श्रीपती तरडे यांचा ७/१२ उतारा निघतो.

प्रश्न– आप्पा सखाराम तरडे, आण्णा परबती तरडे व धोंडी श्रीपती तरडे यांचे सर्वे नं.११२/अ मध्ये हिस्से निघत आहेत ?

उत्तर– ते पूर्वेच्या बाजूने निघत आहेत.

हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.११२/अ मधील हिस्सेदारांना गावठाणातुन येण्यासाठी वादग्रस्त जागा गट योजनेमध्ये मोकळी ठेवली होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.११२/अ मध्ये आम्हा भावाच्या वाटपांमध्ये मला क्षेत्र दिलेले नव्हते. ते क्षेत्र राऊ भाऊ व शंकर भाऊ यांच्या वारसांना दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, १९७५ ते १९७९ च्या दरम्यान मी ग्रामपंचायतीतील लोकांना हाताशी धरुन दावा मिळकतीचा खोटा उतारा माझ्या नावचा तयार केला. आमचा उतारा खरा आहे हे दर्शविण्यासाठी आम्ही बामणोली गावच्या ग्रामसेवकाला साक्षीकामी तपासण्यास तयार आहे.

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांच्या विनंती वरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

मेढा. (रविंद्र भ. खवले)

दि.०७/०१/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.